

## ध्येय-धोरणांना किंमत नाही, 'चमचामृत'च हवे
## या खासदारांनी कितीही प्रश्न विचारले तरी 'मौनी' ते 'मौनी'च

*२४ एप्रिल १९८९*

महाराष्ट्राच्या बाबतीत संशयाच्या सापशिडीचा आपला आवडता खेळ काँग्रेसश्रेष्ठींनी सुरू केलेला दिसतो. नाकापेक्षा मोती जड ठरू नये, म्हणून मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पक्षातीलच नेते मंडळी काहींना फूस देत आहेत. बंडखोरांना जेरबंद करण्याऐवजी त्यांचे उपद्व्याप चालू देण्याचे हे धोरण म्हणजे "चोराला चोरी कर म्हणून तर सांगायचे, पण सावकाराला सावध राहायचा इशारा द्यायचा" असे आहे, असे महाराष्ट्राच्या एका ज्येष्ठ खासदाराने अनौपचारिक गप्पा मारताना केलेले वर्णन मार्मिकच आहे.

स्वबळावर उभा राहणारा नेता दिल्लीश्वरांना आवडत नसतो. कोणीही पंख उभारून उडायचे नाही, पक्षी व्हायचे नाही, फार फार तर पतंग होऊ शकता; कारण दोरी आमच्या हाताला राहील, असा दिल्लीकरांचा नेहमीचाच खाक्या. ध्येय-धोरणे याबद्दलच्या निष्ठांना काही किंमत नाही, येथे वैयक्तिक निष्ठेचे 'चमचामृतच' हवे; त्यामुळे पवारांबद्दलच्या अविश्वासाचा भुंगा त्यांना सतत पछाडत राहणार. ते मुख्यमंत्री झाले तेव्हापासूनच त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचा उद्योग काही मंडळींनी पद्धतशीरपणे चालविला. "पवार भरवशाचे नाहीत, ते केव्हा दगा देतील, याचा नेम नाही," अशी सतत गरळ श्रेष्ठींच्या कानात ओतण्याचे काम चालू आहे. राजीव गांधी व त्यांचे अननुभवी सल्लागार अशा गोष्टी सांगणाऱ्यांचा अंतर्गत मतलब लक्षात न घेता त्यावर विश्वास ठेवतात. पक्षातील गाऱ्हाणी ऐकण्यासाठी राजीव गांधींनी समन्वय समित्या स्थापन केल्या. महाराष्ट्राच्या या समितीचे अध्यक्ष बी. शंकरानंद आहेत. त्यांना अंतुले, निलंगेकर व तिरपुडे या त्रिकुटाने भेटायला हवे होते. पण राजीव गांधींनी त्यांना भेट दिली. त्यामुळे या मंडळींच्या अंगात तर बळच संचारले. एक केंद्रीय मंत्री या तिघांना भेटायला टाळत होते, पण पंतप्रधानच भेटले म्हटल्यावर त्यांनीही मग या तिघांना भेटीची वेळ दिली. पंतप्रधानांनी भेटीत काय सांगितले, यापेक्षा त्यांनी भेट दिली, याचा पूर्ण राजकीय फायदा ही मंडळी उठवू पाहात आहेत. पंतप्रधानांनी त्यांना ही विश्वासार्हता प्राप्त करून देणे योग्य नव्हते.

**उघड मोहीम**

अर्थमंत्री शंकरराव चव्हाण यांनीही उघडपणे त्याच दिवशी मुंबईत आमदारांच्या

भेटी घेतल्या, ही बाबही सूचक आहे. चव्हाण कोणाविरुद्ध अशी मोहीम चालवत नाहीत. त्यांनी हा मार्ग अनुसरला याचा अर्थ त्यांना दिल्लीकरांचा आशीर्वाद असावा, असा काढला जातो. चव्हाण हे केंद्रीय मंत्री आहेत. पंतप्रधानांना ते केव्हाही भेटू शकतात. त्यांना पवारांच्यासंबंधी गाऱ्हाणे असले, तर सांगू शकतात. पण तसे न करता त्यांनी उघडच मोहीम खोलणे, हेही पक्षाच्या दृष्टीने हितकारक नाही. चव्हाण यांनीच मुख्यमंत्री पदासाठी नेतानिवडीच्या आमदार बैठकीत पवार यांचे नाव सुचविले होते, याचा त्यांना विसर पडला काय?

## शिलेदारांचा आव

अंतुले, तिरपुडे व निलंगेकर या तिघा शिलेदारांनी दिल्लीवर स्वारी केली आणि जणू बंडाचे निशाण लाल किल्ल्यावर उभारून आलो की नाही, असा आव आणला. पंतप्रधानांची भेट मिळाली म्हणजे अर्धी लढाई जिंकलीच, असा एकूण त्यांचा वागण्याचा नूर होता. तिरपुडे, निलंगेकर हे मंडी हाऊस भागातील राज्य सरकारच्या महाराष्ट्र सदन या अतिथिगृहात उतरले होते. तर गोरगरिबांचे कैवारी आपणच, असा उमाळा दाखवणारे अंतुले पंचतारांकित अशोक हॉटेलच्या ५५४ नंबरच्या खोलीत तळ ठोकून होते. आदल्या दिवशी "आमचे प्रवक्ते तिरपुडे आहेत, त्यांनाच काय ते विचारा," असे पत्रकारांना सांगणाऱ्या अंतुले यांनी पंतप्रधानांना भेटून आल्यावर मात्र प्रवक्त्याची सूत्रे आपल्या हाती घेतली.

त्या दिवशी आपल्या त्या खोलीचा त्यांनी खलबतखानाच करून टाकला होता. अंतुले हे महाचलाख, महामुत्सद्दी असले; तरी पत्रकारांना नेमके काय सांगावे (खरे तर काय सांगू नये), हे ठरवायला त्यांना तब्बल एक तास लागला, "शीला दीक्षित, आर.के. धवन यांच्याशी आम्ही तासभर चर्चा केली, पंतप्रधानांशी ३५ मिनिटे चर्चा केली, त्यानंतर कॅप्टन सतीश शर्मांशी एक तास चर्चा केली. पंतप्रधानांनी आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले व आमचे अपेक्षेपेक्षा जास्त समाधान झाले." या चार वाक्यांपलीकडे अंतुलेंची गाडी काही जाईना. खोदून खोदून विचारले, तरी तुम्हीच काय ते अनुमान काढा, निष्कर्ष काढा, असे अंतुले सांगत बसले. निलंगेकर शांतपणे कोचावर बसून होते, तर तिरपुडे खोलीभर अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होते. कोणत्याही क्षणी महाराष्ट्रात नेतृत्व बदल झाला; तर आपण विनाविलंब तयार असावे, असा त्यांचा विचार असावा. पत्रकारांची पीडा लौकर बाहेर पडलेली बरी, असा त्रासिक भावही त्यांच्या चेहऱ्यावर तरळत होता. नेतृत्व बदल करावा की नाही, हे पंतप्रधानांनी ठरवावे, असे एक मौलिक (खरे तर राजीव गांधीशिवाय दुसरे कोण ठरवणार?) वाक्यही अंतुले यांनी ऐकवले. बाकी तोंडाची चिकटपट्टी काढायला ते तयार नव्हते. ते पत्रकारांना तिरपुडे वा निलंगेकरांशी बोलूही देत नव्हते. एरवी अंतुले म्हणजे सुपरफास्ट एक्स्प्रेस. मनात येईल ते धाडधाड बोलणार, हा त्यांचा खाक्या. पण या वेळी मात्र त्यांचा एकूणच

पवित्रा कमालीचा सावधगिरीचा होता. त्यामुळे 'येथे तेजाळले अंतुले'ऐवजी 'येथे ओशाळले अंतुले' असेच जणू वाटत होते!

## सचोटीचे नाहीत

महाराष्ट्रात दरवर्षी नवा मुख्यमंत्री अशी राजकीय फॅशनच पडू लागलेली दिसते. कोणाला धड टिकूच द्यायचे नाही, असा विडाच काही मंडळींनी उचललेला असावा. सध्याच्या महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांत शरद पवार यांच्या तोडीचा दुसरा नेता नाही. निवडणुकीत काँग्रेस पक्षाला हमखास विजय मिळवून देईल, असे दुसरे कोणीही नाही. अंतुले यांचे काही समर्थक कोकणात आहेत, पण विधान परिषद निवडणुकीत अंतुल्यांना स्वतःच्या नातेवाइकाला निवडून आणता आलेले नाही. तिरपुडे यांनी कधी निवडणूक लढवली नाही. विधान परिषदेचे सदस्यत्व घेण्यात त्यांनी धन्यता मानली व निलंगेकरांनी आपल्या मतदारसंघात घट्ट पाय रोवले असले, तरी त्यांना अन्यत्र पाठिंबा नाही. हे तिघेही नेते सचोटीचे नाहीत. अंतुले - निलंगेकर यांना न्यायालयाच्या ताशेऱ्यामुळे मुख्यमंत्रीपदावरून जावे लागले. या तिघांनाही महाराष्ट्राच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांची, तेथील जनतेच्या व्यथा-वेदनांची, केंद्र सरकार करत असलेल्या राज्याच्या उपेक्षेची काळजी असती; तर त्यासाठी त्यांनी दिल्लीचे दरवाजे ठोठावले असते वा ज्या काँग्रेस संघटनेची त्यांना इतकी चिंता वाटते आहे, त्या संघटनेच्या वतीने आंदोलन त्यांनी छेडले असते. पण त्यांना फिकीर आहे सत्तापदांची. त्यामुळे विश्वास, पत, प्रतिष्ठा गमावलेल्या या नेत्यांनी 'शरद पवार हटाव' ही मागणी करण्यासाठी दिल्लीला मुसंडी मारली. यावरून त्यांना जनतेचा कळवळा आहे की, खुर्चीचा लळा आहे, हे स्पष्ट व्हावे. या तिघांची पक्षश्रेष्ठींकडे फारशी डाळ मात्र शिजलेली नाही. एक मात्र खरे की, पवार यांची कारकीर्द हवी तशी अजून झळाळून उठलेली नाही. त्यांनी घोषणा मुबलक केल्या, पण शासनाचा गाडा फारसा हलला नाही.

## चाळीस मिनिटांत संपला

दिवसेंदिवस संसदेच्या अधिवेशनात खासदारांना रस वाटेनासा झाला आहे. देशाच्या भाग्याचा फैसला करू शकणारी बहुतेक खासदार मंडळी गैरहजर राहूनही भत्ते घेण्यात धन्यता मानतात. सहा दिवसांच्या सुटीनंतर लोकसभेची गेल्या आठवड्यात बैठक भरली, ती जोशात नव्हे; तर जांभया देतच. पहिल्या दिवशी तर प्रश्नोत्तराचा तास साफच कोसळला; कारण प्रश्न विचारणाऱ्या वीस जणांपैकी पंधरा जण अनुपस्थित होते. त्यामुळे चाळीस मिनिटांतच हा तास संपला. लोकसभेत प्रत्येक मिनिटाला आठ हजार रुपये खर्च येतो. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी माहिती गोळा करण्यावर हजारो रुपये खर्ची पडतात. पण त्याची कोणालाच फिकीर वाटत नाही.

या प्रश्नोत्तराच्या तासात जे गैरहजर होते, त्यांत महाराष्ट्राचे रामकृष्ण मोरे व

बनवारीलाल पुरोहित हे होते. शरद दिघे यांचा प्रश्न होता व ते हजरही होते. एरवी पुरोहित हे प्रश्नोत्तराच्या तासाला हमखास हजर असतात आणि जवळजवळ दररोज त्यांचा किमान एक प्रश्न तरी तारांकित (म्हणजे तोंडी चर्चेला येऊ शकणारा) असतोच. ही किमया कशी घडते, हे गूढच आहे; कारण भल्या भल्या खासदारांचे प्रश्न हे तारांकित प्रश्नांच्या यादीत येत नाहीत. पण पुरोहित भलतेच भाग्यवान. नेहमी आपल्या प्रश्नाला हजर असणारे पुरोहित त्या दिवशी मात्र गैरहजर होते. मोरे यांचा तर लोकसभेत हजर न राहण्याचा विक्रमच आहे. त्यांना भारताची राजधानी पुणे असावी असे वाटते की काय, कोण जाणे; कारण ते दिल्लीत क्वचितच येतात. पुण्यात नाना संस्था, कारखाने काढावेत, सत्तेची साय चाखावी, असा त्यांचा समज असल्याने जनतेच्या ज्वलंत प्रश्नांची त्यांना सय येणे कठीणच. लोकसभा कार्यालयाकडे प्रश्नांचा भारा लिहून धाडला की आपली खासदारकीची जबाबदारी संपली, असा त्यांचा भ्रम असावा. या प्रश्नांचे पुढे काय होते, त्यांचा पाठपुरावा आपण केला पाहिजे, अशी कळकळ काही त्यांना वाटत नाही. त्यामुळे त्यांचे अनेक प्रश्न तोंडी चर्चेला आले, तरी मोरे आपले गैरहजरच. आपली गणना मौनी खासदारांत होऊ नये, म्हणून महाराष्ट्रातील काही खासदार हे वाटेल त्या विषयावर भरपूर लेखी प्रश्न पाठवतात आणि गायब होतात. म्हणजे ते असतात मौनीच, पण आपण एवढे प्रश्न विचारले होते, अशी फुशारकी मारून आपण सक्रिय खासदार असल्याचा भास निर्माण करतात इतकेच. मतदारांनीच अशा खासदारांना जाब विचारायला हवा.

## गंभीर चर्चाच नाही

यंदाच्या अर्थसंकल्पावर लोकसभेत गंभीर चर्चाच झाली नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. हे 'बजेट' अधिवेशन आहे की 'बायकॉट' अधिवेशन असा प्रश्न पडावा, इतक्या वेळा विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार टाकला. शंकरराव चव्हाणांनी अर्थसंकल्प मांडला तो विरोधकांच्या रिकाम्या बाकांसमोर नि त्यावरील चर्चा झाली तीही रिकाम्या बाकांच्या मूक साक्षीने. सर्वसाधारण चर्चेनंतर मंत्रालयांच्या मागण्यांवर तपशीलवार चर्चा होते. त्या निमित्ताने मंत्रालयाच्या कारभारावर, विविध योजनांवर सखोल चर्चा घडू शकते, टीका–टिप्पणी होऊ शकते. सरकार कोट्यवधी रुपये खर्च कसे करते, याचा पंचनामा करता येतो. तेव्हा अशी चर्चा ही सरकारच्या विविध खात्यांवर अंकुश ठेवण्यासाठी उपयुक्त असते. यंदा या आपल्या जबाबदारीकडे संसदेने दुर्लक्षच केले. अधिवेशन चालू असताना लांबलचक सुट्या घेण्याची सुरू करण्यात आलेली प्रथा, विरोधी खासदारांचे सदस्यत्व निलंबित करणे व त्यांचा बहिष्कार यामुळे हे घडले आहे. होळीच्या निमित्ताने लोकसभेने दहा दिवस सुटी घेतली, तर बैसाखी व रामनवमीच्या निमित्ताने आणखी सहा दिवस सुट्टी घेतली. सुटी खासदारांची असल्याने ती बिनपगारी नव्हती, हे उघडच आहे.

अर्थसंकल्पीय चर्चेची तिसरी व अंतिम फेरी २७ एप्रिल रोजी सुरू होणार आहे

आणि २ मे रोजी वित्त विधेयक मंजूर करून एकूण अर्थसंकल्पीय प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. याचा अर्थ २६ एप्रिलपर्यंत विविध मंत्रालयांच्या मागण्यांवर चर्चा पार पाडायची आहे. हातात अवघे सहा दिवस आणि चर्चा करायची आहे तेरा मंत्रालयांची. ऊर्जा, वाणिज्य, मनुष्यबळ विकास, परराष्ट्र संबंध, मजूर, गृह, कृषी, जलसंपत्ती विकास, संरक्षण, उद्योग, पेट्रोलियम, माहिती व नभोवाणी आणि दळणवळण खाते यांचा त्यांत समावेश आहे. त्यांपैकी फक्त ऊर्जा व कृषी मंत्रालयाची चर्चा झाली, तर आणखी फार तर दोन मंत्रालयांच्या मागण्यांचा फडशा पाडला जाईल आणि मग उरलेल्या मंत्रालयांच्या मागण्या 'फासावर चढतील!' त्याला सांसदीय भाषेत चर्चेला 'गिलोटिन' लावणेच म्हणतात. याचा अर्थ अक्षरश: हजारो कोटींच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर कसलीही चर्चा न करता लोकसभा शिक्कामोर्तब करील.

**'समिती पद्धत' हवी**

ही बाब निश्चितच गंभीर आहे. सरकारी कारभाराची छाननी करण्याचा मोठा हक्कच लोकसभा बजावणार नाही. त्यामुळे सध्याची अर्थसंकल्पीय चर्चेची पद्धतीच बदलावी काय, याबाबत पुन्हा मूलभूत विचार करण्याची पाळी येऊन ठेपली आहे.

माजी लोकसभाध्यक्ष बळीराम भगत, के.एस. हेगडे व सध्याचे लोकसभाध्यक्ष बलराम जाखर यांनी 'समिती पद्धत' अवलंबावी, असे सुचविलेले आहे. अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा झाल्यावर विविध खात्यांच्या अनुदान मागण्यांवर खासदारांच्या विविध समित्या अत्यंत खोलवर चर्चा करतील. त्या काळात लोकसभेस तीन-चार आठवड्यांची सुटी राहील. (त्यामुळे सणावारांच्या नावे खास सुटी घेण्याची गरज राहणार नाही.) समित्या आपला अहवाल लोकसभेस सादर करतील व मंजुरी दिली जाईल. त्या त्या मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी समित्यांच्या बैठकीस हजर राहून आवश्यक ती माहिती पुरवू शकतील आणि खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण चर्चा होईल. असा प्रस्ताव सभागृहाच्या नियमविषयक समितीकडे गेल्या लोकसभेने पाठवला होता. पण तो शीतपेटीत ठेवून दिलेला दिसतो. निदान सध्याची चर्चेची शोचनीय स्थिती लक्षात घेता या प्रस्तावावर सर्वांनी मिळून गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

सभागृहात अनेकदा गणपूर्ती (कोरम) नसते. नियमानुसार दहा टक्के खासदार (म्हणजे पंचावन्न) तरी सभागृहात हजर असलेच पाहिजेत. पण महत्त्वाची विधेयकेदेखील पुरेशी गणसंख्या नसताना मंजूर होतात, ही बाब भयानक आहे. घटनेनुसार सदनात गणपूर्ती नसतानाही एखादे विधेयक संमत झाले; तर ते कायदेशीर आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होऊ शकेल. तो जर न्यायालयांनी ग्राह्य मानला; तर संसदेने मंजूर केलेले कायदे अवैध ठरतील, याचीही सर्व पक्षीयांनी दखल घ्यायला हवी. □□

– अशोक जैन

('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)